# अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २४१ /२०२४ दि. १३/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, अंबरनाथ वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने १४० अंबरनाथ (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाचे स्ट्रॉगरुम महात्मा गांधी विद्यालय, महात्मा गांधी चौक, अंबरनाथ पश्चिम येथे असुन सदर ठिकाणी दिनांक १९/११/२०२४ रोजी मतपेटया वाटप व दिनांक २०/११/२०२४ रोजी मतपेटया संकलन होणार आहे. सदर स्ट्रॉगरुम हे कल्याण शहराकडुन बदलापुर शहराकडे जाणाऱ्या राज्य महामार्ग क्र. ७६ वर आहे.** सदरवेळी परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद–** १) बदलापुर कडुन अंबरनाथ शहरामधुन उल्हासनगर, कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **फॉरेस्ट नाका** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने फॉरेस्ट नाका येथुन डाव्या बाजुने वळुन पुढे टी पॉईंट वैभव हॉटेल पुढे नेवाळी नाका मार्गे कल्याण व उल्हासनगर मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) उल्हासनगर येथुन मटका चौक मार्गे अंबरनाथ शहरामध्ये तसेच बदलापुर, कर्जत कडे येणारी जड अवजड वाहने यांना **साईबाबा मंदिर** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने उल्हासनगर येथुन श्रीराम चौक, चक्की नाका मार्गे डावे बाजुने वळुन पुढे नेवाळी नाका मार्गे बदलापुर व कर्जत मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ३) वैभव हॉटेल येथुन लोकनगरी मार्गे मटका चौक या दिशेने येणारी जड अवजड वाहने यांना **वैभव हॉटेल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची जड अवजड वाहने वैभव हॉटेल पासुन पुढे सुदामा हॉटेल मार्गे फॉरेस्ट नाका तसेच वैभव हॉटेल कडुन नेवाळी नाका मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही दिनांक १९/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० पासुन ते दिनांक २०/११/२०२४ रोजी रात्रौ २४:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व निवडणुकीची वाहने तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर

मा.पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर

मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत:– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे</u>

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– <u>सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.</u>

२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner